**पोलीस उप-आयुक्त,गुन्हे पिंपरी चिंचवड**
पोलीस आयुक्त कार्यालय,पिंपरी चिंचवड,
प्रेमलोक पार्क,चिंचवड,पुणे-३३दुरध्वनी क्र. ०२०-२७३५०१२०
ई मेल आयडी – dcphq.pcpc-mh@gov.in

# प्रेस नोट ता.१३/०९/२०२४

## तरुणांना नशेसाठी बेकायदेशीरपणे औषधी इंजेक्शन विकणाऱ्या दोन इसमांना केले जेरबंद.

### पिंपरी चिंचवड,गुन्हे शाखा,युनिट १ ची कारवाई.

मा.पोलीस आयुक्त श्री विनयकुमार चौबे साहेब यांनी अवैध अंमली पदार्थ विरोधी विशेष मोहिम राबवुन गुन्हेगारांची माहीती मिळवुन कायदेशीर कारवाई करणेबाबत गुन्हे शाखांना आदेशीत केले आहे. गुन्हे शाखा युनिट -१ चे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक जितेंद्र कदम त्यांचे अधिपत्याखालील पोलीस अधिकारी व अंमलदार असे पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय हद्दीत अवैध अंमली पदार्थ विक्रीकरणा-या गुन्हेगारांची माहीती घेत असतांना दिनांक ११/०९/२०२४ रोजी पोलीस हवालदार ९८४ सोमनाथ बो-हाडे यांना त्यांचे गोपनिय बातमीदाराकरवी बातमी मिळाली कि, दोन इसम नशेसाठी वापरली जाणारी औषधी इंजेक्शन विक्रीसाठी नेवाळेवस्ती परिसरात येणार आहेत अशी खात्रीशीर बातमी मिळाली.

गुन्हे शाखा पोलीस उप आयुक्त संदिप डोईफोडे व सहा. पोलीस आयुक्त डॉ. विशाल हिरे यांना याबाबतची माहीती कळवुन त्यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट १ चे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक जितेंद्र कदम यांनी गुन्हे शाखा युनिट १ चे श्रेणी पोलीस उप निरीक्षक शिवाजी कानडे व स्टाफ यांचे दोन पथक तयार करुन पंच व ड्रग्ज इन्सपेक्टर विकास पाटील असे नेवाळेवस्ती चिखली येथील शिव शंभो, एच पी पेट्रोलपंपाजवळ जावुन सापळा लावुन थांबलो असता बातमीदाराने सांगितलेल्या वर्णनाचे दोन इसम दुचाकी मोटार सायकलवर संशयित रित्या थांबलेले दिसले असता युनिट १ चे स्टाफने दोन इसमांना शिफारतीने पकडले. त्याचे नाव १) सुमित गणेश पिल्ले वय ३२ वर्षे रा.संत तुकाराम नगर नेवाळेवस्ती चिखली -आकुर्डीरोड चिखली पुणे २) कनिष्कराज ऊर्फ राणा अरुण सुरवसे, वय २१ वर्षे रा.गल्ली नं.३ शरदनगर चिखली यांचे इडतीत इसम नामे सुमित पिल्ले यांचे ॲक्टीव्हा

मोपडचे डिक्कीत व कनिष्कराज ऊर्फ राणा सुरवसे यांचे सॅगमध्ये MEPHENTERMINE SULPHATE INJECTION I.P. हे अवैधरित्या नशेसाठी वापरली जाणारी औषधी इंजेक्शन्स मिळुन आली. सदर इसमांचे ताब्यातुन दोन मोटारसायकल, मोबाईल फोन व MEPHENTERMINE SULPHATE INJECTION I.P. हे अवैधरित्या नशेसाठी वापरली जाणारी औषधी इंजेक्शन असा एकुण २,३२०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदरबाबत युनिट १ चे पोलीस अंमलदार श्रीधन बाळासाहेब इचके यांचे सरकार तर्फे दिले फिर्यादीवरुन चिखली पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर नंबर ५२९/२०२४ भारतीय न्याय संहिता कलम १२३, २७८, १२५, ३(५) प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

आरोपी सुमित गणेश पिल्ले वय ३२ वर्षे रा.संत तुकाराम नगर नेवाळेवस्ती चिखली -आकुर्डीरोड चिखली पुणे यांचे विरुध्द पिंपरी चिंचवड व पुणे शहर आयुक्तालयाचे हद्दीत वाहन चोरी व अंमली पदार्थ विरोधी एकुण १४ गुन्हे नोंद आहेत.

सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त श्री विनयकुमार चौबे, सह पोलीस आयुक्त श्री शशिकांत महावरकर, अप्पर पोलीस आयुक्त श्री वसंत परदेशी, पोलीस उप आयुक्त गुन्हे श्री संदिप डोईफोडे, सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे श्री विशाल हिरे, सहाय्यक पोलीस आयुक्त श्री बाळासाहेब कोपनर यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट १ चे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक जितेंद्र कदम, श्रेणी पोलीस उपनिरीक्षक शिवाजी कानडे, पोलीस अमंलदार सोमनाथ बोऱ्हाडे, महादेव जावळे, मनोजकुमार कमले, श्रीधन इचके,अजित रुपनवर,प्रमोद गर्जे,तानाजी पानसरे यांनी केली आहे.

(संदिप डोईफोडे)
पोलीस उप आयुक्त गुन्हे
पिंपरी चिंचवड